दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक ९१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.१ जुलै २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## आता विधिमंडळात बहुमत सिद्ध करा; राज्यपाल भगतसिंह कोश्यारींचे नव्या सरकारला आदेश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एकामागून एक घडलेल्या अभूतपूर्व घडामोडींनंतर अखेर शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची तर, देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मात्र, यानंतर आता राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी नव्या सरकारला आपले बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याच पार्श्वभूमीवर शनिवार, २ जुलै रोजी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. आता नव्या सरकारला बहुमत चाचणीला सामोरे जावे लागणार आहे. शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्यासह ३८ हून अधिक आमदारांनी केलेल्या मोठ्या बंडानंतर राज्यात पराकोटीचा सत्तासंघर्ष आठवडाभरापासून पाहायला मिळाला. यानंतर अखेरीस उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपद आणि विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. यानंतर भाजप आणि शिंदे गटाने बहुमत सिद्ध करून नवीन सरकार स्थापन करणार असल्याचे जाहीर केले.

# एकनाथ शिंदे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ; तर देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्राचे ३० वे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी आज पद व गोपनीयतेची शपथ घेतली तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.

राजभवनच्या दरबार हॉलमध्ये आयोजित शपथविधी सोहळ्यात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शिंदे आणि फडणवीस यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. राष्ट्रगीतानंतर शिंदे यांनी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या आशीर्वादाचा उल्लेख करून मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.



या सोहळ्यास केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील, केंद्रीय वित्त राज्यमंत्री भागवत कराड यांच्यासह सर्वश्री प्रवीण दरेकर, चंद्रकांत पाटील, आशिष शेलार, सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, मंगलप्रभात लोढा, चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, राधाकृष्ण विखे पाटील आदी मान्यवर तसेच मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, नितीन गद्रे, प्रधान सचिव दीपक कपूर, मनीषा म्हैसकर, विकास खारगे, मुंबई महानगरपालिका आयुक्त इकबालसिंह चहल, एमएमआरडीएचे आयुक्त एसव्हीआर श्रीनिवास, पोलिस महासंचालक रजनीश सेठ, मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयातील छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

त्यानंतर मंत्रालयात एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## पनवेलमध्ये सेनेला धक्का महानगर प्रमुख रामदास शेवाळे एकनाथ शिंदे सोबत

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

सेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी सेनेत बंडखोरी केल्यानंतर राज्यभर त्याचे पडसाद उमटले. रायगड मधील ही तीन आमदारांनी बंडखोरी करत एकनाथ सोबत यांची साथ दिली. पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुद्धा एकनाथ शिंदे यांना मानणारा मोठा गट आहे. पनवेल मधील सेनेचे महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांनीही सेनेला जय महाराष्ट्र करीत आपण एकनाथ शिंदे यांच्या सोबत असल्याचे जाहीर केले आहे. माझ्या सोबतच अनेक पदाधिकाऱ्यारी व हजारो शिवसैनिक हे एकनाथ शिंदे सोबत येतील असा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे पनवेलमध्ये सेनेला जोर का धक्का दिला आहे.



राज्यात शिंदेच्या बंडाचा परिणाम सेनेची पडझड मोठ्या प्रमाणात होण्यात झाली. तब्बल ४६ आमदार एकनाथ शिंदे यांच्यासोबत केल्याने सेनेला जोर का झटका राज्यभर लागला असल्याचे दिसून आले आहे. पनवेल तालुक्यामध्ये सुद्धा एकनाथ शिंदे यांना मानणारा मोठा गट आहे .एकनाथ शिंदे यांच्या नेहमी संपर्कात असणारे सेनेचे पनवेल महानगर पालिका प्रमुख रामदास शेवाळे यांनीही आपण एकनाथ शिंदे सोबतच असल्याचे जाहीर करून सेनेला जोरका झटका दिला आहे. रामदास शेवाळे यांनाही पनवेल तालुक्यात मानणारा चांगला गट आहे. त्यांच्या समवेत अनेक शाखाप्रमुख व हजारो शिवसैनिकही असल्याचा दावा त्यांनी केला असून लवकरच तेही शिंदे यांच्या समवेत येतील असा त्यांनी दावा केला आहे. लवकरच एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असल्याचे रामदास शेवाळे यांनी सांगितले आहे.

## उद्धव ठाकरेंनी विश्वासाने एकनाथ शिंदेंवर जबाबदारी टाकली त्याचा हा परिणाम : शरद पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीवर भाष्य केलं. यामध्ये तीन चार गोष्टी आहेत, गेले काही दिवस आसाम राज्यामध्ये या राज्यातील ३८ ते ३९ विधानसभेचे सदस्य गेले होते. त्यामध्ये जी मागणी असावी, एकतर राज्याच्या नेतृत्त्व बदलाची आणि कुणाला तरी त्याठिकाणी काम करण्याची संधी मिळावी. आसाममध्ये जे सहकारी गेले त्याचं ज्यांनी नेतृत्त्व केलं त्यांची अपेक्षा उपमुख्यमंत्री पदापेक्षा अधिक होती. पण, भाजपमध्ये आदेश एकदा आला दिल्लीचा आदेश असेल किंवा नागपूरचा आदेश असेल त्यामध्ये तडजोड नसते. त्यामुळं हा आदेश आला त्याचा परिणाम म्हणजे राज्याच्या मुख्यमंत्री पदाची जबाबदारी एकनाथ शिंदे यांच्यावर पडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री व्हावं लागलं, असं शरद पवार म्हणाले.



आदेश दिल्यानंतर तंतोतंत पाळावा लागतो याचं उत्तम उदाहरण म्हणजे ज्यांनी मुख्यमंत्री म्हणून पाच वर्ष काम केलं, विरोधी पक्ष नेते म्हणून काम केलं होतं. एकदा आदेश झाला की सत्तेची कोणतीही संधी स्वीकारायची असते याचं उत्तम उदाहरण देवेंद्र फडणवीस यांनी घालून दिलं आहे. या दोन्ही गोष्टी आपल्याला कुणाला माहिती नव्हत्या, असं शरद पवार म्हणाले.

आधी उद्धव ठाकरेंना टोला, तोच नशिबाचा धागा पकडत राज ठाकरेंच्या एकनाथ शिंदेंना शुभेच्छा

एकदा मुख्यमंत्री पदावर गेल्यानंतर त्याच यंत्रणेतील अन्य पद स्वीकारण्याची उदाहरण यापूर्वी होती. माझ्या मंत्रिमंडळात शंकरराव चव्हाण माझे अर्थमंत्री होते. त्यांच्या मंत्रिमंडळात मी मंत्री होते. शंकरराव चव्हाण यांच्यानंतर शिवाजीराव निलंगेकर मुख्यमंत्री होते त्यात मंत्री म्हणून ते जॉईन झाले. अशोकराव चव्हाण मुख्यमंत्री होते, त्यांनी मंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली होती. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांची कृती आश्चर्यकारक वाटली नाही.

आता जे मुख्यमंत्री झाले ते एकनाथ शिंदे ठाण्याचे प्रतिनिधी आहेत. पण, ते सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील आहेत. यशवंतराव चव्हाण हे सातारा जिल्ह्यातील होते. बाबासाहेब भोसले, पृथ्वीराज चव्हाण हे सातारा जिल्ह्यातील होते. आता ज्यांनी शपथ घेतली ते एकनाथ शिंदे सातारा जिल्ह्यातील आहेत. सातारा जिल्ह्याला लॉटरी लागलं, असं म्हणता येईल.

आज एकनाथ शिंदे यांच्यावर जबाबदारी पडली. मी त्यांना शुभेच्छा दिल्या आणि .../२

## कुरुळचे सरपंच, पत्रकार ॲड.जनार्दन पाटील यांचे निधन



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कुरुळचे सरपंच, पत्रकार ॲड. जनार्दन पाटील (४६) यांचे बुधवारी पुणे येथे कर्करोगाने निधन झाले.

त्यांच्यावर मंगेशकर हॉस्पिटल येथे उपचार सुरू होते. पंधरा वर्षाहून अधिक काळ त्यांनी विविध विषयांना वाचा फोडली.

त्याबद्दल मानवी हक्क वार्ता पुरस्कारासह जिल्ह्यातील विविध पत्रकार संघटनांकडून त्यांचा गौरवही करण्यात आला होता. उत्तम वकील अशी त्यांची ख्याती होती.

कुरुळचे सरपंचपदावरही ते कार्यरत होते. बुधवारी रात्री कुरुळच्या स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ज्येष्ठ कन्या साध्वी हिने त्यांना अग्नी दिला.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली असा परिवार आहे. अंत्यसंस्काराच्या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साईनगर-सुशील ब्लॉसम-कर्नाळा स्पोर्टस् रस्त्याची दयनीय अवस्था

### तातडीने दुरुस्त करा विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांचे निर्देश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

तहसील कार्यालया जवळून पनवेल बाहेर जाण्यासाठी असलेल्या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून, साईनगर, बावन बंगला परिसरातील नागरिकांना याचा प्रचंड त्रास भोगावा लागत आहे. वर्षानुवर्षे हा रस्ता दुर्लक्षित राहीलेला आहे.

सदर रस्त्यावरून दररोज कामानिमित्त, मॉर्निंग वॉक साठी, शालेय विद्यार्थ्यांच्या गाड्यांची मोठा प्रमाणात वर्दळ या रस्त्यावरून असते. परंतु पावसात या रस्त्यावर मोठे खड्डे पडले. तसेच त्या रस्त्याच्या लगत जाणाऱ्या सिवरेज लाईन मधील घाण पाणी या खड्ड्यांमध्ये साचत होते अशी तक्रार त्या परिसरातील नागरिकांनी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्याकडे केली. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी त्वरित सदर रस्त्याचा पाहणी दौरा केला. त्यावेळी त्यांच्यासोबत स्थानिक नगरसेविका सारिका भगत उपस्थित होत्या.

तेथे राहणाऱ्या सुशील ब्लॉसम, अपटाऊन अवेन्यू, सुशील रुक्मिणी या इमारतीमधील रहिवासीयांनी त्यांची व्यथा पनवेल महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसमोर प्रितम म्हात्रे यांच्यासमोर मांडली. यावेळी सर्वप्रथम रस्त्यावरील खड्डे भरून नागरिकांना चालण्यासाठी रस्ता सुस्थितीत .../२

> सदर ठिकाणी पाहणी केल्यावर अत्यंत रस्त्याची चाळण झालेली आहे ती अधिकार्यांना दाखवली तसेच सिवरेज ड्रेनचे पाणी रस्त्यावर येत असल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे एकीकडे महापालिका करोडो रुपये नालेसफाई वरती खर्च करते आणि दुसरीकडे नियोजन शून्य कारभारामुळे गेल्या महिन्याभरापासून ड्रेनजचे पाणी रस्त्यावर येऊन परिसरात दुर्गंधी पसरते हे अत्यंत खेदजनक आहे. सदरचा रस्ता लवकरच नागरिकांसाठी दुरुस्त करून घेऊ. तसेच हा रस्ता नव्याने कॉंक्रिटीकरण करण्यासाठी माझ्यासोबत स्थानिक नगरसेविका सारिका भगत आम्ही पाठपुरावा केलेला आहे:
>
> **- प्रितम जनार्दन म्हात्रे**
> **विरोधी पक्षनेते, प.म.पा.**

## कोकण विभागीय आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्याकडे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोकण विभागीय आयुक्त विलास पाटील (भा.प्र.से.) हे आज गुरुवार, दि.३० जून २०२२ रोजीपासून नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले.

तद्नंतर प्रशासकीय कारणास्तव कोकण विभागीय आयुक्त या पदाचा अतिरिक्त कार्यभार रायगड जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर (भा.प्र.से.) यांच्याकडे पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात आला आहे.



## लोकांनी विश्वास दाखवला आहे, कामातून गतीमान प्रशासनाचा संदेश पोहचवूया : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### मंत्रिमंडळ बैठकीनंतर साधला सचिव, अधिकाऱ्यांशी संवाद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

लोकांनी आपल्यावर विश्वास दाखवला आहे. आपल्या कामातून शासन प्रशासन गतीमान आहे, हा संदेश देऊया, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले. मंत्रालयात मंत्रिमंडळ बैठकीनंतर सचिव तसेच वरिष्ठ अधिकारी यांच्याशी संवाद साधताना ते बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठकीस उपस्थित होते.

मंत्रिमंडळ बैठकीत दि. २ व ३ जुलै रोजी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन घेण्याचा निर्णय घेण्यात आला. अधिवेशनात पहिल्याच दिवशी विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे.

मंत्रालयातील समिती सभागृहात झालेल्या बैठकीत बोलताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, ‘आपण नवीन सुरुवात करत आहोत. आपल्यासोबत अनुभवी असे उपमुख्यमंत्री आहेत. त्यामुळे कारभार करण्यास अडचण येणार नाही. राज्यातील विकास कामे, विविध प्रकल्प यांना गती द्यावी लागेल. विविध समाज घटकांना न्याय देण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी हातात हात घालून काम करावे लागते. शासन आणि प्रशासन ही एका रथाची दोन चाके आहेत. लोकांनी आपल्यावर विश्वास दाखवला आहे. तो आपल्याला सार्थ ठरवायाचा आहे.

आपल्या कामातून गतीमान शासन प्रशासन आहे. असा संदेश आपण कामांच्या माध्यमातून देऊया. मेट्रोचे प्रकल्प, हिंदूहृदसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग तसेच जलसंपदा विभागांचे महत्त्वाचे प्रकल्प कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावयाचे आहेत. त्यासाठी प्रशासनाचे सहकार्य मिळेलच, हा विश्वास आहे.’

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ‘आपल्या सोबत पुन्हा काम करण्याची संधी मिळाली आहे. गतिशीलतेने आणि निर्णय क्षमतेने महाराष्ट्र पुढे नेऊया.’

यावेळी राज्याचे मुख्य सचिव मनुकूमार श्रीवास्तव तसेच सर्व विभागांचे सचिव आदी उपस्थित होते. मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील खरीप हंगाम पीक पाणी पीक विमा तसेच राज्यातील कोरोना प्रादुर्भावाबाबतची परिस्थिती यांचे सादरीकरण करण्यात आले.



मंत्रालयात आगमन करताच मुख्यमंत्री श्री. शिंदे तसेच उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# पीकपाण्याचे संकट

महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन झाल्याची वर्दी हवामान खात्याने दिली, त्याला दोन आठवड्यांहून अधिक दिवस झाले असले, तरी राज्याच्या बहुतेक भागाला अद्याप पावसाची प्रतीक्षा आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या चारही हवामान विभागांत फारसा पाऊस झाला नाही. काही ठिकाणी दोन-चार सरी आल्या, काही ठिकाणी तुरळक पाऊस झाला; मात्र बहुतेक भाग कोरडाच राहिला. धुळे, नंदूरबारपासून नाशिक, नगर, पुणे, सोलापूर, कोल्हापूर अशी मोठी व्याप्ती असलेल्या मध्य महाराष्ट्रात जूनमधील पावसाची सरासरीपेक्षा असलेली तफावत ६० टक्क्यांहून अधिक आहे. मराठवाड्यात गेल्या काही दिवसांत पाऊस होतो आहे; परंतु जूनची सरासरी काही गाठली गेलेली नाही. विदर्भातही मान्सूनचे पहिले दोन आठवडे कोरडे गेले; नंतरच्या आठवड्यात स्थिती बरी असल्याचे हवामान खाते आकडेवारी दर्शविते. एरवी भरभरून बरसणाऱ्या पावसाने कोकणाकडे पाठ फिरविल्याचे चित्र असून, तिथेही सरासरीपेक्षा साठ ते सत्तर टक्के पाऊस कमी आहे. लांबलेल्या पावसामुळे बहुतेक पेरण्या खोळंबल्या; ज्या झाल्या त्याही दहा-पंधरा टक्क्यांपेक्षा अधिक नाहीत. पिण्याच्या पाण्याची स्थिती चिंताजनक बनली आहे. धरणांमधील पाणीसाठा झपाट्याने आटत चालला आहे. मुंबईसह काही शहरांत पाणीकपात लागू केली गेली आहे. पुण्यातील पाण्याच्या मुबलकतेबद्दल कुत्सितपणे बोलले जात असले, तरी प्रत्यक्ष या महानगरात पाण्याची समस्या बिकट आहे. पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत जेमतेम पावणेतीन अब्ज घनफूट (टीएमसी) पाणीसाठा शिल्लक आहे. उजनी धरणातील पाणीसाठा उणे असून, एकंदरीत राज्यातील धरणसाठा सरासरी वीस टक्क्यांपर्यंत खाली आलेला दिसतो. पाऊस आणखी काही दिवस लांबला, तर पाण्याबाबत आणीबाणी निर्माण होऊ शकते. पाण्याची समस्या अशा प्रकारे बिकट झाली, तर तिला आपण कसे सामोरे जाणार हा कळीचा प्रश्न खरा; परंतु हाच काय अशा कोणत्याच प्रश्नांबाबत आपली तयारी नाही. मुंबईत आणि पुण्यात पाणीकपात लागू होत असल्याने हा विषय ऐरणीवर तरी आला. राज्यातील बहुतेक शहरांसाठी पाणीकपात ही आताची नव्हे, तर नित्याची बाब. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर यांसारखी काही शहरे वगळता, राज्यातील अन्य शहरांत पाणीपुरवठ्याची स्थिती वाईट आहे. औरंगाबाद, सोलापूर यांसारख्या मोठ्या शहरांत पाच दिवसांनी पाणीपुरवठा होतो. मनमाडमध्ये तर महिन्यातून दोनदाच पाणीपुरवठा होतो. ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणात विहिरांचाच वापर होतो. गेल्या तीन-चार वर्षांत चांगला पाऊस झाल्याने, ग्रामीण महाराष्ट्रात उन्हाळ्यात टँकरची संख्या फार वाढली नाही; परंतु तोकड्या पायाभूत सुविधा आणि अपुरे नियोजन यांमुळे महानगरांत टँकरचा वापर वाढतो आहे. त्या त्या भागांतील लोकांना याची सवयही होते आहे. त्यामुळेच जिव्हाळ्याचा विषय असूनही, पाण्याचा मुद्दा निवडणुकांत ऐरणीवर येत नाही. सध्या राज्यात मोठे सत्तानाट्य सुरू असून, महाविकास आघाडी सरकारचे अस्तित्व पणाला लागले आहे. लांबलेला पाऊस, आटलेला पाणीसाठा आणि पाणीकपात यांवर ना लोकप्रतिनिधी बोलत आहेत, ना मंत्री. आज ना उद्या पाऊस पडू लागेल आणि पीकपाण्याचा प्रश्न आपोआप सुटेल, अशीच सर्वांची भावना दिसते. उशिरा येऊनही पाऊस सरासरी पूर्ण करतो, या गेल्या काही वर्षांतील अनुभवाच्या जोरावर लोक दिवस ढकलत आहेत; पण हवामानही बदलत आहे, वाढत्या प्रदूषणाचा फटका त्याला बसतो. प्रदूषणकारी वायूंमुळे तापमानात होत असलेली वाढ आणि त्याचा हवामानावर होत असलेला परिणाम ही केवळ वैज्ञानिक संकल्पना नसून, वस्तुस्थिती आहे. गेल्या काही वर्षांत हवामान अधिक लहरी होत असून, अवर्षण आणि अतिवृष्टी यांचे प्रमाण वाढले आहे. चक्रीवादळांचे प्रमाणही वाढले आहे. या पार्श्वभूमीवर हवामानाचा, विशेषतः मान्सूनचा अंदाज वर्तविणेही आव्हानात्मक बनलेले दिसते. नेहमीच्या निकषांवर आधारित गणिती प्रारूपाद्वारे वर्तविल्या जाणाऱ्या अंदाजातील त्रुटी वाढत आहे; त्यामुळे त्यातील अचूकता कमी होत असल्याचे दिसते. यंदा मान्सूनच्या आगमनापासून रोज वर्तविल्या जाणाऱ्या भाकिताबाबत हा अनुभव येतो आहे. मुसळधार पाऊस होईल, असा अंदाज असतो; परंतु लख्ख ऊन पडलेले असते, अशी स्थिती आहे. त्यामुळे अंदाजाचे विज्ञान पुन्हा तपासण्याची, त्यावर अधिक संशोधनाची गरज आहे. दुसरीकडे आवश्यकता आहे, ती पाऊस लांबला, तर काय परिस्थिती येऊ शकते हे ओळखून धोरण आखण्याची. पिण्याच्या पाण्याबाबत योग्य नियोजन करावे लागेल. पाणी वाया जाणार नाही, यासाठी उपाययोजना कराव्या लागतील. पाण्याच्या फेरवापरापासून पर्जन्यसंचयापर्यंत विविध योजना अधिक कार्यक्षम कराव्या लागतील. शेतीबाबत योग्य मार्गदर्शन व्हायला हवे. राज्यातील राजकीय संकटापेक्षा पीकपाण्याचे संकट मोठे आहे; त्याकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही.

# फॅन्ड्री फाऊंडेशन तर्फे जांभूळपाडा केंद्रातील ९ शाळांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

फॅन्ड्री फाऊंडेशन तर्फे जांभूळपाडा केंद्रातील ९ शाळांना नुकतेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. यामुळे येथील सर्व गरीब, गरजू तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल इतके शैक्षणिक साहित्य मिळाले असल्याने त्यांच्या शिकण्यात व अभ्यासात कोणताच अडथळा येणार नाही. परिणामी येथील विद्यार्थ्यांसह शिक्षक व मुख्याध्यापक सुद्धा आनंदी आहेत.

सण २०१६ पासून या फँड्री फाउंडेशन कडून या शाळांना विविध शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येत आहे. अशी माहिती राजीप पावसाळावाडी शाळेचे मुख्याध्यापक आनंदा पाटील यांनी दिली. शैक्षणिक साहित्य वाटप करतेवेळी फँड्री फाऊंडेशनच्या आशा चिमनकर, विनायक खांडेकर, लक्ष्मण पवार, सत्यवान वाघमोडे, स्वप्नील कूवर, आनंदा पाटील व फँड्री फाऊंडेशन चे इतर स्वयंसेवक उपस्थित होते.




**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, श्री.ज्ञानेश्वर यशवंत रणपिसे, रा.मांजुर्णे, ता.माणगाव, जि.रायगड यांचे मालकीची, कसवणुकीची व ताबेकब्जातील, शेतजमीन मिळकती मौजे : मांजुर्णे, ता.माणगाव, जि.रायगड येथील मिळकत आहे ती खालीलप्रमाणे :-

**मौजे : मांजुर्णे, ता.माणगाव, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| मांजुर्णे | १३/२ | वरकस ४-११-०० पो.ख. वर्ग (अ) ०-९५-०० एकूण ५-०६-०० पैकी आमचे अशिलाचे हिश्श्याचे क्षेत्र ०-९१-०० पो.ख. ०-९५-०० एकूण १-८६-०० | ०.६५ |

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

मौजे : मांजुर्णे, ता.माणगाव, जि.रायगड येथील सर्व्हे नं.१३/२ मधील एकूण क्षेत्र ५-०६-०० (हे.आर.पॉ.) पैकी १-८६-०० हे.आर.पॉ. एवढी मिळकत १) श्री.संदीपकुमार एस. दत्त, २) श्री.वैभव तुकाराम भोर यांनी वरील नमूद जमीन मालक श्री.ज्ञानेश्वर यशवंत रणपिसे यांचेकडून कायम फरोक्त खताने विकत घ्यावयाची ठरविली आहे. सदरहू मिळकत त्यांचे माालकीची असून महसूल दप्तरी सातबारा सदरी त्यांचे नावाची नोंद दिसून येत आहे. सदरहू मिळकत ही श्री.ज्ञानेश्वर यशवंत रणपिसे यांच्या मालकीची वहिवाटीची कसवणुकीची व ताबेकब्जातील आहे. तरीही सदरहू मिळकती संदर्भात कोणासही हरकत असेल अथवा अन्य कोणी सदरहू मिळकती संदर्भात हितसंबंधी असल्यास सदरहू हरकत अथवा लेखी पुरावा आमचे अशिलांना सदरहू नोटीस मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर हरकत नोंदवावी.

**सही/-**
**ॲड.सुमित अविनाश म्हात्रे**
**जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४,**
**गावदेवी मंदिरासमोर, राम गणेश गडकरी**
**मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.८८७९८९७०६९/९८९२१३२६७३**



मे.गोडसे साो

प्रो.जमा.६-२५ **अर्जदाराचे वकील**
**ॲड.तुषार एल सोंडकर**

**जाहीर नोटीस**

दि.चौ.अर्ज नं.५३३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०७/२०२२

श्री.रोहताश कुमार वर्मा
वय : ६० वर्षे, धंदा :
रा.फ्लॅट नं.२०२, श्री रेणुका सी.एच.एस.,
प्लॉट नं.३३, सेक्टर ११, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.निता सिंग वर्मा हे दि.२६/०४/२०२१ रोजी राकम्युनिटी हेल्थ सेंटर, छुईखदान, राजनांदगांव, छत्तीसगड ४९१८८५ येथे मृत्यू पावले आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

१) मारुती अल्टो कंपनीची के १० एल.एक्स.आय. सनलाईट कॉपर रंगाची चार चाकी गाडी
गाडी नं. MH 06 AZ 4035
चेसी नं. 122334
इंजिन नं. 4132906

कै.निता सिंग वर्मा यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ३०/०६/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## साईनगर-सुशील ब्लॉसम-कर्नाळा स्पोर्ट्स रस्त्याची दयनीय अवस्था

करून द्यावा अशी सूचना विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी केली. त्याबरोबरच चोकअप सीवरेज लाईन मधील रस्त्यावर येणारे सांडपाणी चोकअप काढून यापुढे रस्त्यावर येणार नाही यासाठी योग्य ते नियोजन करण्याचे सांगितले.

पत्राद्वारे तक्रार केल्यानंतर त्वरित कार्यवाही करून स्वतः त्या ठिकाणी लक्ष देऊन समस्या निवारण्यासाठी प्रयत्न केले त्याबद्दल विरोधी पक्षनेते .प्रितम म्हात्रे आणि नगरसेविका सारिका भगत यांचे रहिवाश्यांनी आभार मानले.

## उद्धव ठाकरेंनी विश्वासाने एकनाथ शिंदेंवर जबाबदारी टाकली त्याचा हा परिणाम

अपेक्षा व्यक्त केल्या. राज्याचा मुख्यमंत्री झाल्यानंतर शपथ घेतल्यानंतर पक्षाचा प्रतिनिधी असला तरी तो राज्याचा प्रमुख होतो. राज्याचे प्रश्न सोडवावेत, अशी अपेक्षा त्यांना बोलून दाखवली आणि शुभेच्छा व्यक्त केल्या, असं शरद पवार म्हणाले.

एकनाथ शिंदे शिवसेनेतील लोकांना बाहेर न्यायला प्रभावी ठरले. ३८ आमदार बाहेर जातात ही साधी गोष्ट नाही.ती नेण्याची कुवत शिंदे यांनी दाखवली, असं शरद पवार म्हणाले. महाराष्ट्राच्या विधिमंडळाशी माझा अधिक संपर्क राहिलेला नाही. या सर्वाची तयारी फार पूर्वीपासून सुरु होती. सुरत ते गुवाहाटी आणि गोवा असा प्रवास झाला. उद्धव ठाकरे एखाद्यावर विश्वास टाकल्यावर त्यांच्यावर पूर्णपणे जबाबदारी द्यायची, अशा स्वभावाचे आहेत. उद्धव ठाकरेंनी संघटनेची, विधिमंडळाची जबाबदारी पूर्णपणे एकनाथ शिंदे यांच्यावर दिली होती, त्याचा हा परिणाम आहे, असं शरद पवार म्हणाले.

महाविकास आघाडी वाचवण्यासाठी चर्चा केली पण ज्यावेळी ३९ लोकं राज्याच्या बाहेर जातात, वेगळी भूमिका घेतात त्यावेळी दुरुस्तीला वाव नव्हता, असं शरद पवार म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांनी दोन नंबरची जागा आनंदानं स्वीकारली असेल, असं त्यांचा चेहरा सांगत नव्हता. देवेंद्र फडणवीस नागपूरचे आहेत, संघाचे आहेत ते आदेशाचं पालन करतात, असं शरद पवार म्हणाले.

# शिवसेना पुरस्कृत शिवराज प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विविध दाखल्यांचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पुरस्कृत शिवराज शिवराज प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था व तहसिल पनवेल महाराजस्व अभियान कार्यक्रमाअंतर्गत विविध दाखले, रेशनकार्ड, आधारकार्ड, संगायो योजना लाभ शिबीर, विविध दाखल्यांचे वाटप पनवेल तालुक्यातील पालेबुद्रुक येथील संजय गांधी स्मारक हायस्कुल येथे करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उदघाटन संजय गांधी स्मारक हायस्कुलचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, शिवसेना उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, उपजिल्हासंघटक परेश पाटील, कार्यक्रमाचे आयोजक व अध्यक्ष विश्वास पेटकर, संस्थेचे कार्याध्यक्ष पांडुरंग भोईर, खजिनदार विष्णू जोशी, चेअरमन भाऊशेठ भोईर, संचालक प्रकाश म्हात्रे, जनार्दन भोईर, सदस्य हेमराज म्हात्रे, पालीबुद्रुक सरपंच राजेश भोईर, उपसरपंच रोहिणी भोईर, सदस्य दिलीप पाटील व प्राचार्य डि. डि. कुंभार आदी उपस्थित होते. यावेळी शिवसेना संपर्क प्रमुख व स्व. दि बा पाटील प्रकल्पगस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटील यांनी या शिबिरास भेट दिली असता आयोजकांच्या वतीने नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील साहेब याचे नाव दिल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर बडे, उपतालुका प्रमुख शांताराम कुंभारकर, विभागप्रमूख प्रमोद पाटील, दत्ता फड़के, समाजसेवक संदीप तांडेल, शहर संघटिका ज्योती मोहिते, विभाग संघटिका नीलिमा पाटील, शाखाप्रमुख जगन्नाथ म्हात्रे, उपविभागप्रमुख विष्णू भोईर, हिरामण भोईर, शाखाप्रमुख प्रवीण पाटील, काशिनाथ पाटील, या कार्यक्रमास शासकीय मदत करणारे तलाठीसजा पालेबुद्रुक आर.एन.मांढरे, रमेश यानबुरे, सेतू कर्मचारी प्रवीण सातव, निखिल घाटे, आधार केंद्र संचालक संचित मुकादम यांनी काम पाहिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिव राज दरे, सदस्य मिनाज भोईर, खजिनदार प्रदीप पाटील, सहसचिव योगेश भोईर, सहखजिनदार विकास पेटकर, सदस्य राहुल पाटील, ओंकार पाटील, विकी म्हात्रे, भागेश गडगे, जयदीप उबाळे, रवी पेटकर, विराज पेटकर, सचिन पाटील, गोविंद गडगे यांनी विशेष मेहनत घेतली.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत **श्री.जगदीश हरी ठाकूर** यांचे स्वकष्टार्जित खरेदी मालकी हक्क व कब्जेवहिवाटीचे असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजेणकामी सदर नोटीस देण्यात येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत मुळ कागदपत्रानिशी आमचे खालील पत्यावर येवून खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**परिशिष्ट** :- तुकडी रायगड, पोटतुकडी तालुका : उरण, मे.दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा : रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील **मौजे : बोरी बुद्रुक,** येथील मिळकत **भूमापन/सर्व्हे नं.२०(१)/४** यांसी एकूण क्षेत्र ०.६०.०० (हे. आर.प्र.) व पोटखराबा ००.०६.०० (हे.आर.प्र.), आकार रक्कम रुपये ६.२५ पैसे पैकी क्षेत्र ०.०८.०० (हे.आर.प्र.) यांसी चतुः सिमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहीत दरोबस्त.

रायगड
दि.१/०७/२०२२

**सही/-**
**श्री.विनायक ताम्हणकर, वकील**
**खरेदीदारातर्फे वकील**
**पत्ता : ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३,**
**भ्रमणध्वनी क्र.८६६८५५१३१२**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस सदर जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, श्री.सोपान पांडुरंग पाटील, मु.भिंगार, पो.अजिवली, ता.पनवेल यांचे नावे महसूल रेकॉर्डला नोंदविलेल्या पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकतीमध्ये आमचे अशिल श्री.ज्ञानेश्वर पांडुरंग पाटील, मु.भिंगार, पो.अजिवली, ता.पनवेल यांचा अविभाज्य सामाईक हिस्सा असून तो ठरवून व निर्तुटक करून मिळण्याकरिता आमचे अशिल श्री.ज्ञानेश्वर पांडुरंग पाटील यांनी सदर १) श्रीमती. देवकीबाई उर्फ द्रोपदी पांडरंग पाटील, २) श्री.सोपान पांडुरंग पाटील, ३) श्रीमती.विठाबाई पंढरीनाथ दळवी उर्फ विठाबाई पांडुरंग पाटील व ४) श्रीमती.ललिता गोविंद मुखिया उर्फ मुक्ताबाई पांडुरंग पाटील यांच्या विरुद्ध पनवेल येथील मे.सहदिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात रे.मु.नं.१६०/२०२२ हा दावा दाखल केला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| गट क्र. | हि. नं. | क्षेत्र: भात हे.आर.पॉ. | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.पॉ. | क्षेत्र: एकूण हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ८२ | २ | ०-३६.५० | ०-०१.५० | ०-३८.०० | ८.१८ |

सदर रे.मु.नं.१६०/२०२२ हा दावा आजमितीसही न्यायप्रविष्ठ असून सदर दावा प्रलंबित असल्याबाबत श्री.ज्ञानेश्वर पांडुरंग पाटील यांनी दि.०४/०५/२०२२ रोजी दावा दाखल केला आहे. त्यासंबंधी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असून सदर मिळकतींसबंधी कुणीही कोणत्याही प्रकारे व्यवहार करू नये असे याद्वारे तमाम जनतेस सुचित करण्यात येत आहे. या उप्परही सदर मिळकतीसंबंधी कुणीही कोणत्याही प्रकारे व्यवहार केल्यास त्याची कोणतीही जबाबदारी आमचे अशिलांवर येणार नाही. अगर अशा व्यवहारामुळे आमचे अशिलांचे हक्कांस बाधा निर्माण होणार नाही, कळावे.

पनवेल
दि.३०/०६/२०२२

**सही/-**
**ॲड.किरण बाळकृष्ण भगत**
**ॲड.धनश्री मारुती पाटील**
**०३, तळमजला, परिगंधा बिल्डींग, धुतपापेश्वर कार्नर जवळ, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८२०३०२१०२/९९३०४७४५७९**



मा.गोडसे मॅडम कोर्ट
**ॲड.अजित धनराज म्हात्रे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.९७६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०८/२०२२

१) मरयमबी मो.युसूफ काझी
वय : ७४ वर्षे, धंदा : काहीच नाही
रा.घर नं.३८, मेन बाजार पेठ, तळोजा पाचनंद,
तळोजा मजकूर, तळोजे, पनवेल, रायगड
पै.अब्दुल अल्लीसाहेब शेख उर्फ मोकाशी
मयत तर्फे वारस
२) आयेशा अब्दुल शेख उर्फ मोकाशी
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
३) आमजद अब्दुल शेख उर्फ मोकाशी
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.जावेद अब्दुल शेख उर्फ मोकाशी
वय : ३६ वर्षे, धंदा : शेती
अर्जदार क्र.२ ते ४ रा.तळोजा पाचनंद,
तळोजा मजकूर, तळोजे पनवेल
५) मुमताज अशफाक शेख
वय : ३५ वर्षे, धंदा : घरकाम
रा.घर नं.७२ ब, जिल्हा परिषद
शाळेजवळ, मु.पो.दहिसर, ठाणे
पै.अहमद अल्लीसाहेब मोकाशी
मयत तर्फे वारस
६) भट्टु अहमद मोकाशी
वय : ४६ वर्षे, धंदा : शेती
७) अली अहमद मोकाशी
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
८) रफिक अहमद मोकाशी
वय : ४० वर्षे, धंदा : शेती
६ ते ८ रा.हनुमान जवळ, सिद्धी करवले,
करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड
९) रेशमा रियाज काझी
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.३८, मेन बाजार पेठ, तळोजा पाचनंद
तळोजा मजकूर, तळोजे, पनवेल रायगड
१०) रुबिना इरफान शेख
वय : ३५ वर्षे, धंदा : घरकाम
रा.रुम नं.३, चाळ-२, गणेश नगर,
बदलापूर पाईप लाईन, शिरढोण, ठाणे अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे वडील तसेच अर्जदार क्र.२ यांचे सासरे तसेच अर्जदार क्र.३ ते १० यांचे आजोबा पै.अल्लिसाहेब मम्दुमिया मोकाशी हे दि.२४/०८/१९६६ मौजे : मु.करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच त्यांची आई ह्या देखील फार वर्षापूर्वी मयत असून त्यांच्या मृत्यूची तारीख अर्जदार यांना सांगता येत नाही. तसच त्यांची पत्नी फातीमाबीबी अल्लिसाहेब मोकाशी ह्या दि.१२/०९/१९६७ मौजे : मु.करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच त्यांचा मुलगा अहमद अल्लिसाहेब मोकाशी हे दि.१३/०५/१९९९ रोजी मु.सिद्धी करवले, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच अहमद अल्लिसाहेब मोकाशी यांची पत्नी अमिना अहमद मोकाशी दि.०५/१२/२०१९ रोजी मौजे : तुर्भे येथे मयत झाल्या आहेत. तसेच पै.अल्लिसाहेब मम्दुमिया मोकाशी यांचा नातू व अहमद मोकाशी यांचा मुलगा जानी अहमद मोकाशी दि.०९/०४/२००९ रोजी मु.सिद्धी करवले, ता.पनवेल, जि.रायगड येथे अविवाहित मयत झालेले आहेत. तसेच पै.अल्लिसाहेब मम्दुमिया मोकाशी यांचा दुसरा मुलगा अब्दुल अलिसाहेब शेख उर्फ मोकाशी हे दि.१०/०७/२०१८ रोजी मौजे : तळोजे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. पै.अल्लिसाहेब मम्दुमिया मोकाशी यांचे मालकीची, प्रत्यक्ष ताबेकब्जा आणि वहिवाटीची मौजे : करवले बुद्रुक, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| करवले बुद्रुक | १०३ | १ | ०-२०-०० | २.१३ रु.पै. |

वर नमूद मिळकतीत पै.अल्लिसाहेब मम्दुमिया मोकाशी यांचे वारसदार या नात्याने अर्जदार क्र.१ ते १० यांचा सदरहू मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध निर्माण झालेला आहे. सबब, वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत पै.अल्लिसाहेब मम्दुमिया मोकाशी यांचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस पै.अल्लिसाहेब मम्दुमिया मोकाशी यांचे अर्जदार नं.१ ते १० हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नही.

आज तारीख ३०/०६/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# बहुजन हिताय, बहुजन सुखाय म्हणजे नेमकं काय रे भाऊ? प्रवाशांचा सवाल

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव बसस्थानकाची किळसवाणी अवस्था. स्थानकात नाही पाणी, मुतारी संडास स्वच्छतागृहाची गळती, रस्त्यावर घाण दुर्गंधी पसरलीय. स्थानकातील खड्डे सालाबाद प्रमाणे न सुटलेले कोडेच; खड्डेच खड्डे प्रवाशांची अवस्था बिकट झाल्याचे अनेक प्रवाशी तसेच स्थानिक नागरिकांनी आमचेशी बोलताना सांगितले आहे. राज्य परिवहनचे ब्रीद वाक्याची खिल्ली उडवणारे चित्र दिसतय. बहुजन हिताय, बहुजन सुखाय म्हणजे नेमकं काय रे भाऊ? असा सवाल प्रवासी एकमेकाशी विचारतात. ही अवस्था होण्याचे कारण अनाकलनिय आपल्या आवाक्या बाहेरचे आहे.

कारण दस्तुरखुद्द रायगडचे खासदार सुनिल तटकरे तसेच अनेक खात्यांची जबाबदारी लिलया पेलणाऱ्या मावळत्या कार्यक्षम पालकमंत्री आदिती तटकरे यांनी दोन वर्षा पूर्वी २० फेब्रुवारी २०२० रोजी राज्य परिवहन मंत्री अनिल परब यांना भेटून रायगड जिल्ह्यातील एसटी बसस्थानकां विषयी माहीती देऊन त्यांचे लक्ष वेधले होते. मुंबई, गोवा, पुणे, तसेच इतर जिल्ह्यांतून विविध पर्यटन स्थळांना भेट द्यायला येथे येणाऱ्या पर्यंटकांची संख्या मोठी आहे. अशावेळी जिल्ह्यातील बऱ्याचशा एसटी बस स्थानकांची दुर्दशा झाल्याचे चित्र आहे.

त्यात माणगांवची अवस्थाही फारशी बरी नव्हती. प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी राज्याचे तत्कालिन परिवहन मंत्री अनिल परब यांना पत्राद्वारे एसटी बस स्थानकांच्या तात्काळ दुरूस्तीची त्यांनी मागणी केलेली आहे. आता मात्र सरकार कोसळलयं. येणार नवकोरं सरकार आणि त्यातील लोकप्रतिनिधी मंत्री, पालकमंत्री हा बॅकलॉग भरुन काढतिल, प्रवाशांना दिलासा देतील का, ही अपेक्षा माणगांवकरांना आहे. नाही तर येरे माझ्या मागल्या याची भिती मोठी आहे.



# सहज सेवा फाउंडेशनच्या वतीने लैंगिक शिक्षण उपक्रमाचा प्रारंभ

**दै.रायगड नगरी । खोपोली**

शैक्षणिक शेत्रात सहज सेवा फाउंडेशन सातत्याने भरीव कार्य करीत आहे. वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी पार पडलेली निसर्ग शाळा ही महाराष्ट्रात यशस्वी प्रयोग ठरलेला आहे.शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्याच्या मनातील लैंगिक प्रश्नांना व शंकांना व्यक्त होण्यासाठी व माहिती जाणून घेण्यासाठी सहज सेवा फाउंडेशनच्या वतीने एक हक्काचं सहज व्यासपीठ शाळा व कॉलेज मधील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ आनंद शाळा,शीळफाटा येथुन दिनांक २८ जुन २०२२ रोजी करण्यात आला. पुणे येथील डॉ. विशाखा पवार यांनी विदयार्थी व विद्यार्थिनींना सहजसुलभ भाषेत मार्गदर्शन केले. याचसोबत खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी या शिक्षणाचे महत्त्व विषद केले.

शाळेत व महाविद्यालयीन शिक्षण घेत



असताना अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनीमध्ये लैंगिक समस्या व शंका असतात.आजही समाजात मोकळेपणाने या विषयावर संवाद साधला जात नाही यातील अज्ञानामुळे विपरीत परिणाम सुध्दा शालेय व महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांच्या जडणघडणीवर होत असतात.

सहजसेवा फाउंडेशनच्या माध्यमातुन शहरी व ग्रामीण भागातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या मध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी नामांकीत डॉक्टर्स व समुपदेशक यांच्या मार्गदर्शनाने शालेय वर्ष ( २०२२-२३) या वर्षात शाळांमध्ये सातत्यपूर्ण मार्गदर्शन आयोजित केले जाणार आहे. याचसोबत खोपोली पोलीस स्टेशन, खालापूर पोलीस स्टेशन व कर्जत पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर क्राईम व ऑनलाईन फसवणूक कशी रोखता येईल यासाठी प्रबोधन आयोजीत करण्याचा संस्थेचा मानस आहे तसेच दहावी व बारावी नंतर काय करावे ? यासाठी शाळेमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी उपक्रमाचे आयोजन केले जाणार आहे.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात 3 जुलै रोजी इपिलेप्सी शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय आणि इपिलेप्सी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने येथील जिल्हा रुग्णालयात इपिलेप्सी शिबिराचे रविवार, दि.०३ जुलै २०२२ रोजी सकाळी ०९.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात इपिलेप्सी रुग्णावर योग्य पद्धतीने उपचार होण्यासाठी न्यूरॉलॉजिस्ट किंवा इपिलेप्सीलॉजिस्ट (अपस्मार चिकित्सक) यांच्याकडून निदान व औषध उपचार करण्याच्या दृष्टीने रुग्णाची तपासणी करण्यात येणार आहे.

या इपिलेप्सी शिबिराकरिता दि.०३ जुलै २०२२ रोजी सकाळी ०९.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत जिल्हा प्रशिक्षण केंद्र,जिल्हा रुग्णालय,रायगड अलिबाग येथे सीएमई आयोजित करण्यात आली आहे. या शिबिरात इपिलेप्सी फाऊंडेशन मुंबईचे न्यूरॉलॉजिस्ट डॉ. निर्मल सूर्या हे मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिरात औषधोपचार सल्ला मोफत देण्यात येणार असून औषधेही विनामूल्य पुरविले जाणार आहेत. या शिबिरात आकडी/फिट या रोगांसाठी आवश्यक लागणाऱ्या तपासणीची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी या शिबिराचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त रुग्णांनी सहभागी होऊन उपचार करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांनी केले आहे.

---

मा.सोनावणे साहेब

**वकील मनोज वारंगे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.तिसरे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.३५०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०८/२०२२

1) DEEPA DILIP DEGWEKAR
Residing at : B/704, Akruti Elegance,
90 feet road, Near Gavanpada Bus Stop,
Gavanpada Mulund East, Mumbai-400801
2) RUPALI RAJESH PATWARDHAN
Residing at : Room No.1601, Romell
Uniya Granduer, Building No.7, Hickson
Dadajee layout, Off Vishveshwar Nagar
Road, Near Udpi Vihar, Goregaon East,
Mumbai Suburban Maharashtra — अर्जदार

अर्जदार यांचे वडील मयत कै. SUDHAKAR DIGAMBAR KULKARNI राहणार फ्लॅट नं.१०, ३ रा मजला, बिल्डींग नं.बी-३२, केंद्रीय विहार (४) को.ऑप.हौ.सोसायटी लि., सेक्टर नं.११, खारघर, नवी मुंबई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांचे दि.२७/०५/२०१० रोजी मुंबई येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :

SCHEDULE OF PROPERTY
Flat No.10, 3rd Floor, Building No.B-32,
Kendriya Vihar (4) Co-Oprative Housing
Society Ltd., Sector-11, Kharghar, Navi Mumbai.
Valued at Rs. 8,84,473/-

वरील मिळकती बाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३०/०६/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### शुद्धीपत्रक

दि.१९/०५/२०२२ रोजीच्या **दै.रायगड नगरी** वर्तमानपत्रात **भूखंड क्र.२९ ए, सेक्टर-५४, द्रोणागिरी, एकूण क्षेत्र ४९९.९३ चौ.मी.** या भूखंडाबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर जाहीर नोटीशीमध्ये ''सदर भूखंड माझे अशिल ५०:५०% तत्वावर विकसित करण्याचा विचार करत आहेत'' असा मजकूर छापण्यात आला आहे. त्याऐवजी **''सदरहू भूखंडातील ५०% अविभाज्य भाग हक्क, हितसंबंध माझे अशिल त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करून घेण्याचा विचार करत आहेत''** असा मजकूर वाचण्यात यावा.

सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-
एन.ए.शेख आणि असोसिएटस
वकील व नोटरी
जी/५ आणि सी/२०, अमन सोसायटी,
सेक्टर ५ ई, कळंबोली, नवी मुंबई
मो.नं.९९२०९९६९०९**

---

मा.गुन्नाल साहेब

**वकील श्री.शशिकांत मुंढे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.९३९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१०/०८/२०२२

१) गणेश तानाजी ठाकूर
वय : ४७ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.धुतूम, पो.जासई, ता.उरण
२) महेश तानाजी ठाकूर
वय : ४४ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.धुतूम, पो.जासई, ता.उरण
३) रवींद्र तानाजी ठाकूर
वय : ४२ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.धुतूम, पो.जासई, ता.उरण, जि.रायगड
४) सपना गणेश गडकरी
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बामणडोंगरी, पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
५) कुसुम रामचंद्र नवले
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.विंधणे, पो.दिघोडे, ता.उरण — अर्जदार

ज्यापेक्षा मयत कै.राधाबाई तानाजी ठाकूर, याचे दि.१७/०८/२०१९ रोजी, रा.धुतूम पोस्ट : जासई, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथे निधन झाले. अर्जदार श्री.गणेश तानाजी ठाकूर यांनी मयत यांचा मुलगा व मुलगी या नात्याने कोर्टास सदरहू मयताचे कायदेशीर हक्कदार म्हणून अर्ज केला आहे. त्यांच्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | नोड | सेक्टर | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१७ | ३७७ | १ | ०-२३-० | उलवे १ ब | २१ | ४६ | २०० चौ.मी. |
| | २५८ | ६ | ०-१७-५ | उलवे १ ब | २० | २६ | १५० चौ.मी. |
| | २६१ | ९ | | | - | - | - |
| ५१६ | २४७ | ५ | ०-०८-० | - | - | - | - |

सदर मिळकतीमध्ये मयत कै.राधाबाई तानाजी ठाकूर यांचा १/५ एवढा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळविण्याबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाच्या दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास पनवेल येथील न्यायालयात लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न असल्यास अर्जदाराच्या विनंती प्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या रकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२९/०६/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात

On Admission

आरटीएस अपिल क्र..../२०२२

कै.नारायण सखाराम देशमुख (मयत) तर्फे वारस
कै.हरिभाऊ नारायण देशमुख (मयत) तर्फे वारस
कै.रंजना सुधकर देशमुख उर्फ सिंधू हरिभाऊ देशमुख
१) शुभांगी भगवान देशमुख, रा रुम नं.४, कोडेश्वर रोड, सरकारी हॉस्पिटल जवळ, दहिवली, बदलापूर पूर्व कुळगाव, जि.ठाणे ४२१५०३
२) सौ.उषा प्रवीण देशमुख उर्फ उषा सुधाकर उर्फ चौधरी
रा.मु.पो.नारंगी, ता.खालापूर, जि.रायगड — वादी

विरुद्ध

कै.नारायण सखाराम देशमुख (मयत) तर्फे वारस
१) कै.हरिभाऊ नारायण देशमुख (मयत) तर्फे वारस
१/१) श्री.रवींद्र हरिभाऊ देशमुख
रा.सवणे, पो.आपटा, पनवेल
१/२) श्री.महेंद्र हरिभाऊ देशमुख
रा.रुम नं.४०४, ४ था मजला, गोकुळनगर, बिल्डींग नं.०२, पळस्पे फाटा, डेरवली, ता.पनवेल, जि.रायगड
१/३) सौ.रोहिणी रवींद्र अधिकारी
रा.मु.पो.इंदापूर, ता.माणगाव, जि.रायगड
२) कै.जयराम नारायण देशमुख (मयत) तर्फे वारस
२/१) श्री.राजाराम जयराम देशमुख
२/१/१) श्रीमती.यशोदा राजाराम देशमुख
सर्व रा.सवणे, पो.आपटा, पनवेल
२/१/२) श्री.संजय राजाराम देशमुख
रा.रिलायन्स कॉलनी, मंदिरा शेजारी, लोधिवली, ता.पनवेल, जि.रायगड
२/१/३) श्री.संतोष राजाराम देशमुख
रा.टिंबर मार्ट, चांभार्ली, ता.पनवेल, जि.रायगड
२/१/४) सुवर्णा रवींद्र देशमुख
२/१/५) सुजाता शिवाजी सुर्यराव
२/१/६) विजया अनिल शिंदे
३) कै.रामभाऊ नारायण देशमुख (मयत) तर्फे वारस
३/१/१) श्री.जनार्दन रामभाऊ देशमुख
३/१/२) श्रीमती.सुनंदा भरत देशमुख
रा.वांगणी, वार्ड क्र.१, शिवाजीनगर, भेंडीपाडा, ता.अंबरनाथ, जि.ठाणे
३/१/३) श्री.रामकृष्ण रामभाऊ देशमुख
३/१/४) श्री.अनंत रामभाऊ देशमुख
३/१/५) श्री.वसंत हरिभाऊ देशमुख
४) श्रीमती.तानुबाई शिवराम देशमुख (मयत) तर्फे वारस
४/१/१) श्री.सुरेश शिवराम देशमुख
मु.पाली, पो.गौळवाडी, ता.कर्जत, जि.रायगड
४/१/२) श्रीमती.सुलोचना उर्फ ठकूबाई मधुकर देशमुख
४/१/३) श्री.शालिनी पंढरीनाथ देशमुख
रा.नवघर शेणगांव, पो.जांबरुक, ता.खालापूर, जि.रायगड
४/१/४) श्रीमती.सरिता उर्फ आशा काशिनाथ देशमुख
४/१/५) श्रीमती.वंदना बाळाराम देशमुख
मु.साजगाव, पो.सायले, ता.मुरबाड, जि.ठाणे
५) श्रीमती.विठाबाई पांडुरंग देशमुख
सर्व रा.सवणे, पो.आपटा, पनवेल — प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे : सवणे, ता.पनवेल, जि.रायगड येथील फेरफार नोंद क्र.६७, २३२ विरुद्ध अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दि.१८/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे : सवणे, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | क्षेत्र हे.आर.पॉ. पोटखराबा | क्षेत्र हे.आर.पॉ. एकूण | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| ५ | ०.०५.६० | ०.०७.५० | ०.१३.१० | ०.१२ |
| ९ | ०.२०.९० | ०.०२.५० | ०.२३.४० | ३.९१ |
| २७/१ | ०.३९.९० | ०.०६.३० | ०.४६.२० | ६.४१ |
| ६१ | ०.६५.०० | ०.०४.०० | ०.६९.०० | १.४४ |
| ७९ | १.५८.०० | ०.३६.०० | १.९४.०० | ३.६६ |
| ८८/५ | ०.०४.६० | ०.००.५० | ०.०५.१० | ०.३४ |
| ८९/१ | १.३१.२० | ०.०६.६० | १.३७.८० | २५.३१ |
| ९०/२ | ०.१४.०० | ०.००.०० | ०.१४.०० | ०.४७ |
| १०१ | १.३१.३० | ०.१३.१० | १.४४.४० | ५.५९ |
| ११० | १.३०.०० | ०.०९.६० | १.३९.६० | ५.४१ |
| ११८ | ०.४८.०० | ०.०४.०० | ०.५२.०० | १.०० |
| १२२/२ब | ०.५४.५० | ०.००.०० | ०.५४.५० | १२.९० |
| १२३ | ०.१२.७० | ०.०३.०० | ०.१५.७० | १.०६ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/०६/२०२२

**सही/-
उप विभागीय अधिकारी पनवेल
उपविभाग पनवेल**

---

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) साहेब यांचे न्यायालयात, उरण

दि.चौ.अर्ज नं.१३/२०२१
नि.नं.४६/ड
ने.ता.०५/०७/२०२२

१) श्री.सुरेश यशवंत जोशी
२) श्री.रमेश यशवंत जोशी
३) श्री.विलास यशवंत जोशी
४) श्री.नरेश यशवंत जोशी
५) श्री.जगदीश यशवंत जोशी
६) श्री.राजेश यशवंत जोशी
७) श्री.प्रकाश यशवंत जोशी
८) श्री.यतीदास यशवंत जोशी
९) सौ.मिना नथुराम बंडा
१०) सौ.कविता विनायक पाटील — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. सिताबाई यशवंत जोशी ह्या मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथे दि.१९/०२/२०१९ रोजी मयत झालेले आहेत. कै.सिताबाई यशवंत जोशी यांचे मालकीची व ताबेकब्जे वहिवाटीतील शेतजमीन मिळकत खालील वर्णन केलेल्याप्रमाणे :-

**(मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड)**

| युनिट केस क्र. | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|
| ३७/८२-८३ | २१ | ४ | ०-०५-० |
| | २२ | ८ | ०-२६-८ |
| ३६१/८३-८४ | ७९ | ६ | ०-०१-४ |
| | ९१ | १२ | ०-०५-४ |
| | ९३ | ४ | ०-०७-४ |
| ३६१/८५-८६ | २ | २ | ०-१२-० |
| | २ | ६ | ०-०९-० |
| | २ | ८ | ०-१५-४ |
| | २ | १० | ०-१०-० |
| | २ | ११ | ०-०५-० |
| | २ | १४ | ०-१३-४ |
| | २ | १५ | ०-१३-८ |
| | ५ | १३ | ०-०८-८ |
| | ५ | १४ | ०-०८-८ |
| | ११ | १० | ०-०३-१२ |
| | १६ | १ | ०-०६-४ |
| | १४ | १ | ०-०३-१२ |
| | २७ | ३ | ०-०३-४ |
| | ४० | १ | ०-२८-८ |
| | ४९ | ६ | ०-०७-४ |
| | ५३ | १० | ०-०१-० |
| | ५४ | ७ | ०-०२-८ |
| | ५५ | ४ | ०-०१-१२ |
| | ५९ | ५ | ०-००-४ |
| | ६० | १३ | ०-०२-० |
| | ६५ | २ | ०-०३-८ |
| | १०७ | ६ | ०-०३-८ |
| | १०४ | ११ | ०-०२-८ |
| | ९८ | २ | ०-०१-८ |
| | १२० | ८ | ०-०२-० |
| | १२२ | ३ | ०-१७-४ |
| | १२५ | ५ | ०-०७-१२ |
| | १३० | ५ | ०-०६-८ |
| | १३४ | १३ ब | ०-०९-० |
| | १४४ | १३ | ०-०३-८ |
| | १४६ | २ | ०-०४-४ |
| | १४६ | ७ | ०-०१-१२ |
| | १४६ | ११ | ०-०२-० |
| | १८० | ४ | ०-०५-१२ |
| | १८१ | ५ | ०-११-८ |
| | १८२ | ४ | ०-१३-४ |
| | २०० | २ | ०-१४-४ |
| | २०३ | ७ | ०-१४-८ |
| | २१२ | २ | ०-१५-८ |
| | २१७ | १२ | ०-०५-४ |
| | २२१ | १ | ०-१७-१२ |
| | २२७ | ६ | ०-१०-० |
| | २२८ | २ | ०-०६-८ |
| | २३४ | ३ | ०-१२-४ |
| | २७७ | ६ | ०-०२-८ |
| | २९४ | ४ | ०-०४-० |
| | २९४ | ७ | ०-०२-१२ |
| | २९४ | ८ | ०-११-० |
| | २९५ | १ | ०-१२-० |
| | २९५ | ४ | ०-०४-१२ |
| | २९५ | ७ | ०-०५-१२ |
| | २९७ | १ | ०-०२-४ |
| | २९७ | ११ | ०-०२-४ |
| | २९८ | १ अ | ०-१७-० |
| | २९८ | १ ब | ०-१७-० |
| | २९८ | ४ | ०-१४-४ |
| | २९८ | ८ | ०-१६-८ |
| | २९८ | ९ | ०-१४-४ |
| | २९९ | २ | ०-०४-४ |
| | २९९ | ५ | ०-०४-४ |
| | २९९ | ७ | ०-०६-१२ |
| | २९९ | १० | ०-०४-८ |
| | २९९ | १२ | ०-१८-८ |
| | १३४ | १ अ | ०-०३-१२ |

वरील मिळकतीच्या कै.सिताबाई यशवंत जोशी यांच्या सहमालकी हक्काच्या असून यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार मिळण्यास पात्र आहेत. वर वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत लेखी अथवा तोंडी हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकती दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून, पुरावा घेवून मे.न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान केले जाईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.२३ माहे जून सन २०२२ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण**

# संक्षिप्त...

## ३३ वर्षीय ईसमावर केला चाकूने हल्ला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देवदगाव येथे राहणाऱ्या ३३ वर्षे इसमावर चाकूने जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने हल्ला केल्याप्रकरणी आरोपी विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संकेत अशोक पाटील असे जखमी इसमाचे नाव आहे.

आरोपी शिवरामकृष्ण रविकुमार राव (वय ३० वर्ष, रा. दहिसर, मुंबई) यांची पत्नी विशाखा माईनकर ही गेल्या एक वर्षापासून संकेत पाटील यांच्या सोबत राहत असल्याचा राग मनात धरून आरोपी शिवरामकृष्णाने चाकूने त्यांच्या शरीरावर भोसकून गंभीर दुखापती केल्या. व शिवीगाळ केली. या प्रकरणी हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा खांदेश्वर पोलिसांनी दाखल केला. पोलिसांनी शिवरामकृष्ण रवीकुमार राव याला अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता एक जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## अनोळखी इसमाचा आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल एसटी डेपो परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ४५ वर्षे, उंची साडेपाच फूट, रंग सावळा, डोक्याचे केस बारीक व काळे पांढरे, दाढी खुरटी, अंगात फुल बाहयाचा बळकट शर्ट, काळ्या रंगाची हाप पँट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र. ०२२-२७४५२३३३ किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल देवळे यांच्याशी संपर्क साधावा.

## भोईघर मध्ये कृषी संजीवनी सप्ताह : शेतकऱ्यांना शेवगा रोपे, भाजी बियाणे वाटप

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुका कृषी विभागातर्फे दुर्गम ग्रामीण भागातील भोईघर येथे कृषी संजीवनी सप्ताहानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले, कृषी उपसंचालक दत्तात्रेय काळभोर, तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ मान्यवरांच्या हस्ते आत्मा योजनेअंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना शेवगा रोपांचे तर भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना भाजीपाला बियाण्यांचे मिनी कीट वाटप करण्यात आले.

ग्रामपंचायत सरपंच काशिनाथ वाघमारे, तालुका पंचायत समितीचे माजी सभापती रमेश नागांवकर, कर्मचारी वृंद, शेतकरी, बागायतदार, ग्रामस्थ, कृषी पर्यवेक्षक आर. के.सैंदाणे, कृषी सहाय्यक आदिराज चौलकर, अतुल उपाध्ये उपस्थित होते. या योजनेमध्ये शेतकऱ्यांनी अधिकाधिक सहभाग घ्यावा. असे आवाहन तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ यांनी केले.



**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# करंजाडे येथील गाढी नदीवरील पत्री पूल कोसळला

**दै.रायगड नगरी । पनवेल**



करंजाडे ते भिंगारी सब स्टेशन मधील धोकादायक पत्री पुल गुरुवारी दुपारी अचानकपणे कोसळला. यावेळी या पुलावरून एक दुचाकीस्वार पूल ओलांडताच या पत्री पुलाचा मधला भाग कोसळला. मात्र यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नाही.

याबाबत हा पूल दुरुस्त करण्याकरिता पारेषण विभाग, टाटा पॉवर कंपनीकडे गेल्या दोन वर्षांपासून करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच रामेश्वर आंग्रे यांचा पाठपुरावा सुरु होता. या घटनेची माहिती मिळताच सरपंच रामेश्वर आंग्रे, ग्रामपंचायत सदस्य, पारेषण विभाग, टाटा पॉवर कंपनीचे अधिकारी व पनवेल महापालिकेचे अधिकाऱ्यांनी पाहणी केली व माहिती घेतली.

टाटा पॉवर कंपनी मार्फत गाढी नदीवर बऱ्याच वर्षापूर्वी करंजाडे भिंगारी सब स्टेशन यांना जोडण्यासाठी पत्री पुलाची उभारणी करण्यात आली आहे. परंतु सदर पुलाची अतिशय दुरा-वस्था झाली असुन तो पुल वापरण्यास अयोग्य आहे. पत्री पुल धोकादायक झाला असुन तो पावसाळ्यामध्ये पुरात वाहून जाऊ शकतो व त्या ठिकाणी मोठी जीवित हानी होऊ शकते. करंजाडे येथे शहरीकरण झाले असुन येथील लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे.

येथील नागरिक पनवेल बस स्थानक, रेल्वे स्टेशनकडे जुना पनवेल उरण रस्त्याचा वापर करीत असतात. परंतु उरण नाका येथील रस्त्यावर उरण नाका येथे नेहमी वाहतूक कोंडी होत असल्याने करंजाडे येथील नागरिक पनवेल बस स्थानक व रेल्वे स्टेशनवर जाण्यासाठी पर्यायी रस्ता म्हणुन या पत्रीपुलाचा वापर करतात. त्याचबरोबर पनवेलमधील वाढत्या वाहतूक कोंडीचा प्रमाण पाहता करंजाडे मधील नागरिकांना पनवेल येथे जाण्यासाठी करंजाडे - भिंगारी हा रस्ता सोयीचा असल्याने करंजाडे येथील नागरिकांकडून या पुलावापर होत होता. यावेळी या पुलाच्या दुरुस्ती बाबत करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच रामेश्वर आंग्रे यांचा गेल्या एक ते दोन वर्षांपासून पाठपुरावा सुरु होता. मात्र संबंधित प्रशासनाने दुर्लक्ष केले. मात्र गुरुवारी दुपारच्या सुमारास या पुलावरून पूल ओलांडत असताना अचानकपणे पुलाचा मधला भाग कोसळला. यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेची माहिती मिळताच रामेश्वर आंग्रे, ग्रामपंचायत सदस्य, पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी, पारेषण विभाग, टाटा पॉवर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी घटनेची माहिती घेतली.

करंजाडे भिंगारी सब स्टेशन मधील पत्री पुलाची अवस्था अतिशय धोकादायक दिसून येत आहे. सर्व सामान्यांच्या सुरक्षितेसाठी हया पुलाचा वापर त्वरित बंद करावा असे आमचे मत आहे. तसेच हा पुल सर्व सामान्य नागरिक वापरत असल्याने त्याची देखभाल व दुरुस्ती हि सरकारच्या अधिकार क्षेत्रात येते व संबंधित संस्थेने हे कार्यकरणे गरजेचे असल्याचे पारेषण विभाग, टाटा पॉवर कंपनीचे प्रमुख किरण विनायक देसले यांनी करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी पुलाची दुरुस्ती करण्यासाठी पाठविलेल्या पत्राला उत्तर दिले आहे.

## तळोजा परिसरातील गटारे भरलेलीच ; साफसफाई नाही



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आशिया खंडातील सर्वात मोठी एमआयडीसी असलेली तळोजा एमआयडीसीमधील गटारे कचरा व मातीने भरलेली आहेत. पावसाळा सुरू होऊन देखील बहुतांशी गटारांची साफसफाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे ठेकेदाराने लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्याचे समोर आले आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळ-ोजा एमआयडीसीत पावसाळी पाणी वाहून जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात गटारे बांधण्यात आलेली आहेत. अनेक ठिकाणची गटारे तुडुंब भरलेली आहेत. गटारांमध्ये माती, कचरा सर्व काही साचून राहिलेले दिसून येत आहेत. तळोजा एमआयडीसीतील गटारे साफ करण्याचे लाखो रुपयांचे काम ठेकेदाराला देण्यात आलेले आहे. मात्र त्याने या कामात मलिदा लाटण्याचे काम केल्याचे दिसून येत आहे.

मुख्य रस्त्यालगत असणारी मोजकीच गटारे साफ करण्यात आलेली आहेत. मात्र आतील भागात असणारी गटारांची परिस्थिती गेल्या कित्येक वर्षांपासून जैसी थेच आहे. ही गटारे गेल्या काही वर्षांपासून साफसफाई केलीच नसल्याचे येथील कामगारांचे म्हणणे आहे. त्यात दगड, माती, कचरा साचून राहिलेला दिसून येत आहे.

तळोजा एमआयडीसीतील गटारे साफ करण्याचे लाखो रुपयांचे काम मिळून देखील ठेकेदार या गटारांच्या साफसफाईकडे दुर्लक्ष करत आहे. मात्र त्याला वेळोवेळी बिल अदा करण्यात येत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. त्यामुळे एमआयडीसीचे अधिकारी देखील त्याच्याकडे कानाडोळा करत असल्याचे दिसत आहे.

## कोंकण विभागीय आयुक्त विलास पाटील सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकून विभागीय आयुक्त पदापर्यंतचा प्रवास, हे माझ्या आई-वडीलांच्या कष्टाचे फळ आहे. शासकीय कामाचे केवळ कागदावर नियोजन करण्यापेक्षा प्रत्यक्ष कामावर भर देऊन काम केले, तर यश निश्चित मिळते. माझ्या कोकणातील एक वर्षाच्या महसूल आयुक्त पदाच्या कारकिर्दीत मला महसूलसह सर्व प्रशासकीय विभागांनी उत्तम सहकार्य केले. असे उद्गार विभागीय आयुक्त विलास पाटील यांनी काढले.

कोकण विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या सेवानिवृत्त समारंभाच्या वेळी ते बोलत होते. यावेळी अप्पर आयुक्त किसन जावळे, उपायुक्त सर्वश्री मकरंद देशमुख, मनोज रानडे, गिरीष भालेराव, सोनाली मुळे, वैशाली चव्हाण, रविंद्र जाधव, माणिक दिवे तसेच कोकण भवनातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच विलास पाटील यांच्या पत्नी अमोल विलास पाटील आणि कुटूंबातील सदस्यही या निरोप समारंभास उपस्थित होते.

१८ जुलै १९८५ साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परिक्षा उत्तीर्ण करून उपजिल्हाधिकारी पदावर निवड झालेले श्री.विलास पाटील यांची युपीएससीमधून आय.आर.एस. संवर्गात निवड झाली. परंतू त्यांनी ग्रामीण भागात व तळगाळात काम करण्याच्या इच्छेपोटी उपजिल्हाधिकारी पदाला पसंती दिली. श्री.पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुक्यातील काळकुंद्री या गावात दि.११ जून १९६२ रोजी झाला. वडील प्राथमिक शाळेत शिक्षक व आई गृहिणी असून देखील श्री.पाटील व त्यांची भावंड हे सर्वच शासकीय सेवेत उच्च पदावर कार्यरत आहेत. आपल्या प्रशासकीय कामात व्यस्त असतांनासुध्दा त्यांनी आपल्या गावाची नाळ तोडली नाही. गावाच्या विकासासाठी त्यांनी त्यांच्या स्तरावर जमेल ती कामे केली. काम कोणत्याही परिस्थितीत पुर्णत्वाला नेण्याचा आग्रह, अधिकारी, कर्मचारी यांची काळजी घेणे. त्यांच्या पाठीशी उभे राहणे, भेटीसाठी आलेल्या अभ्यांगतांना ताटकळत न ठेवणे व त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, सर्वांशी अपुलकीने वागणे या अशा स्वभावामुळे पाटील यांचा एक वेगळाच लौकिक कोकण विभागातील महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाला. यावेळी विविध अधिकाऱ्यांनी समयोचित भाषणे केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पर आयुक्त मुंबई किसन जावळे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी डोंगरे यांनी केले.



## बेकायदेशीर रित्या गुटखा विकणाऱ्या सात टपरीधारकांविरुद्ध धडक कारवाई; गुटखा केला हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेकायदेशीर रित्या गुटखा विकणाऱ्या सात टपरीधारकांविरुद्ध धडक कारवाई करून हजारो रुपये किमतीचा गुटखा अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने करंजाडे परिसरातून हस्तगत केला आहे.

पनवेल जवळील करंजाडे परिसरात मोठ्या प्रमाणात शासनाची बंदी असलेला बेकायदेशीररित्या गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखू येथील टपऱ्यामध्ये विक्रीस ठेवून त्याची विक्री होत असल्याच्या अनेक तक्रारी अन्न व औषध प्रशासन पथक पेण यांच्याकडे करण्यात आल्या होत्या.

त्यानुसार अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी सचिन आढाव व त्यांच्या पथकाने करंजाडे परिसरात सात पान टपऱ्यांवर छापे टाकून त्यांच्याकडून १३५४२.५० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून त्या सात जणांविरुद्ध कारवाई करण्यात आलेली आहे. याची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आलेली आहे.

## पुष्पकनगर, माणघर येथे बैलांची हत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील पुष्पकनगर-माणघर सेकटर ७ येथे दोन बैलांची हत्या केल्याचा प्रकार २८ जून रोजी उघडकीस आला आहे. याची माहिती पनवेल शहर पोलिसांना देण्यात आली आहे. त्यानुसार पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला.

पुष्पक नगर-माणघर सेक्टर ७ येथे येथे एका एर्टिगा कार मधून आलेल्या चार ते पाच इस्मानी बैलांची हत्या केली. व त्यांचे मांस घेऊन ते पळून गेले. या प्रकाराची माहिती पनवेल शहर पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली.

पनवेल शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अशाप्रकारे दिवसाढवळ्या बैलांची हत्या करून त्यांचे मांस पळवून नेणाऱ्या आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## स्वच्छतेच्या बाबतीत नागरिकांना वेठीस धरू नका : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**




पनवेल महानगरपालिका अधिकारी, कॉन्ट्रॅक्टर आणि महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्यासोबत विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत कामोठे शहरातील नागरी समस्यांचा आढावा घेण्यात आला. यावेळी सेक्टर ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२ येथील ड्रेनेज लाईनची साफसफाई झालेली नसून पाणी रस्त्यावरून वाहत आहे, तसेच ज्या सेक्टर मध्ये जसे की सेक्टर ३६, ३५, ३४, १८, १९, २०, २१ कॉन्ट्रॅक्टर आणि अधिकारी सांगताहेत की नाले सफाई झाली आहे तेथेही पाहणी केली असता फक्त नाल्याच्या झाकणाखालील माती काढण्यात आली आहे असे निदर्शनास आले. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दोन्ही चेंबरमध्ये माती तशीच असल्यामुळे पाण्याचा निचरा होत नाही असे निदर्शनास आणून दिले. गटार साफसफाईच्या बाबत विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी पोलखोल केली.

रस्त्यांवर साचलेला पाण्यासंदर्भात ठिकठिकाणी सेवेरेज लाईन ओव्हरफ्लो होऊन मलमूत्र रस्तावर येत असल्याचे निदर्शनास आले. काही ठिकाणी महावितरण विभागाच्या उघ्न आणि केबल्स उघड्या अवस्थेत आहेत. या ठिकाणी पावसात शॉर्ट सर्किटमुळे जीवितहानी होण्याची शक्यता आहे याची गंभीर दखल घेत सर्व कामांची पाहणी करून अधिकाऱ्यांना कामाच्या पूर्तता करण्याच्या सूचना विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी केल्या. त्यावेळी महानगरपालिका अधिकारी आणि महाराष्ट्र विद्युत अधिकारी यांनी एका आठवड्यात कामाची पूर्तता करण्याचे आश्वासन दिले आणि तसा रिपोर्टही सादर करू असे सांगितले.

वरील सर्व समस्यांचा पाहणी दौरा करत असताना सोबत शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस नगरसेवक गणेश कडू, नगरसेवक सखाराम म्हात्रे, माजी नगरसेवक शंकर म्हात्रे, मा. नगरसेवक प्रमोद भगत, कार्याध्यक्ष गौरव पोरवाल, व्यापारी संघटना अध्यक्ष सुरेश खरात, प्रमुख शहर संघटक अल्पेश माने, महिला अध्यक्षा उषा झणझणे, लाल ब्रिगेड अध्यक्ष. कुणाल भेंडे, महिला कार्याध्यक्ष शुभांगी खरात, उपाध्यक्ष रमेश गोरे, उपाध्यक्ष विश्वास भगत, व्यापारी संघटना उपाध्यक्ष नाना भगत, गणेश मुळीक आणि कार्यकर्ते आदी उपस्थित होते

## जांभुळपाडा येथे जिवंत विद्युत वाहिनी झाडात गुरपटले

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**



सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा गावातील जुनी कुंभारआली येथे जांभुळीच्या झाडाला विद्युत जिवंत वाहीनीची तार झाडामध्ये गुरपटलेली असुन मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही.

पावसाळ्याचे दिवस असल्याने विज प्रवाह होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही.तसेच रस्त्यालगातच हे झाड असल्याने लहान मुले खेळण्यासाठी येतात, शिवाय नागरिक व जनावरे यांचादेखील या रस्त्यावर मुक्तसंचार असतो. अपघाताचा धोका निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

जोराचा वारा आल्यानंतर तारा एकमेकांना घासून सर्किट होऊन ठिणग्या पडतात. त्यामुळे येथील झाड पेट घेण्याची शक्यता आहे.

वास्तविक संभाव्य धोका लक्षात घेता महावितरणने याठिकाणी योग्य ती व जलद उपाययोजना करणे गरजेचे होते, मात्र महावितरणचे त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे ग्रामस्थांकडून बोलले जात आहे.

## स्त्री शक्ती फाउंडेशनच्या वतीने रस्त्यावर पडलेले खड्डे संदर्भात सिडको व महानगरपालिकेला दिले निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली व रोडपाली येथील रस्त्यावर पडलेले खड्डे व बऱ्याच ठिकाणी रस्त्याची खूप दुर्दशा झाली आहे. यासंदर्भात स्त्री शक्ती फौंडेशन च्या वतीने सिडको व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले.

स्त्री शक्ती फौंडेशन अध्यक्ष सौ विजया चंद्रकांत कदम यांच्या पुढाकाराने शैलेश कुमार मिश्रा, चिमाजी मेंगडे, सुभाष सारतापे, बालकृष्ण म्हात्रे, अक्षय म्हात्रे, ज्ञानोबा पंडित, दत्तात्रय मोरे आदींनी सिडको चे अधिकारी मोहिले, बनकर व चिखलकर व पालिकेचे संजय जगताप यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले. यात त्यांनी म्हटले आहे कि, सेक्टर १ सुधागड स्कुल रिक्षा नाका, सेक्टर २ई पोलिस ठाण्याजवळील रिक्षा नाका, रोडपाली बस डेपो जवळील रिक्षा नाका व डी मार्ट जवळील रिक्षा नाका अश्या सर्व नाक्यावरील रिक्षा चालक यांनी माझ्या कडे तक्रारी केल्या होत्या. रोज त्यांना पोटा पाण्यासाठी रिक्षा चालवावी लागते पण रस्त्यामुळे त्यांना रोज त्रास सहन करावा लागत आहे त्यांच्या कमाई तले अर्धे पैसे आठवड्यात मेन्टेन्स साठीच घालवावे लागतात आणि आपल्या सर्वांना ही तोच त्रास सहन करावा लागतो शिवाय दुचाकी वाले या खड्ड्यात ही पडलेत असे अपघात होत असेल तर याला जबाबदार कोण? यासाठी स्त्री शक्ती फौंडेशन च्या वतीने सिडको आणि महापालिकेला निवेदन देण्यात आले. यावेळी अधिकाऱ्यांनी रस्त्यावर पडलेले खड्डे लवकरच बुजवून देण्याचे आश्वासन दिले.

